# MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED

(A Government of Maharashtra Undertaking)

**Dadasaheb Phalke Chitranagari**

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

## मराठी चित्रपट महोत्सवाच्या पूर्वतयारीचा चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी घेतला आढावा

मुंबई, दि. ११ मार्च : राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी घोषणा केलेला मराठी चित्रपट महोत्सव येत्या २१ ते २४ एप्रिल २०२५ रोजी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे होणार असून या महोत्सवाच्या पूर्वतयारीचा आढावा चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी घेतला. दरम्यान पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी कार्यक्रम स्थळ असल्याने त्याचीही पाहणी केली.

विविध स्तरावर महोत्सवाची तयारी सुरू असून या बैठकीत महोत्सवात प्रदर्शन करण्यात येणाऱ्या चित्रपटांची निवड, चार दिवसांच्या कार्यक्रमाचे संकुल स्वरूप, कार्यक्रम रूपरेषा, फिल्म बाझारचे नियोजन, विविध समित्यांच्या कार्यकक्षा,तांत्रिक घटक आदी विविध विषयांचा आढावा घेण्यात आला.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून दादासाहेब फाळके चित्रनगरी पहिल्यांदाच महोत्सवाचे आयोजन करत आहे. हा महोत्सव यशस्वी होण्यासाठी महोत्सवाचे काटेकोर नियोजन करण्यात येत आहे.

या बैठकीस सह व्यवस्थापकीय संचालक सुजीतकुमार उगले, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा वित्तधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, स्थापत्य उप अभियंता विजय बापट, कलागरे व्यवस्थापक संतोष खामकर, विशेष कार्यकारी अधिकारी संजय कृष्णाजी पाटील, विशेष समन्वयक अधिकारी सुचित्रा देशपांडे, महोत्सव संचालक पुरुषोत्तम बेर्डे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या महोत्सवात चित्रपटांच्या स्क्रीनिंग व्यतिरिक्त कार्यशाळा, परिसंवाद आणि मुलाखतींचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांना चित्रपटांची जत्रा अनुभवण्यासह सिनेमांचा अभ्यासदेखील करता येईल.